# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशी -५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमाक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम. आय.डी. सी. रोड, कॉम्लेक्स, गडचिरोली- ४४२६०५ E-Mail -college.section@unigug.ac.in

गों.वि./म.वि.वि.वि./११८१/२०२६ दिनांक: ०१ /०२/२०२६

## परिपत्रक

**विषय:- 'युवा करिअर क्लब' (बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपुर) यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती प्रसिध्द करणे व विद्यार्थ्यांचे व्यापक प्रसार/नोंदणी अभियान राबविण्याबाबत.**

**संदर्भ:- उशिस/'युवा करिअर क्लब'/मवि-१/ई. ३०५८४६४**

गोंडवाना विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, 'युवा करिअर क्लब' व 'बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपुर' यांच्या संयुक्त विद्यामानाने राज्यातील इयत्ता ८ वी ते १२ वी तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शनाशी संबंधीत विविध प्रकारचे नावीन्यपुर्ण व डिजीटल शैक्षणिक उपक्रम चालवीले जातात.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रम राबविण्याकरीता उपक्रमासंदर्भात अधिक माहितीसाठी कु. स्वाती पगारे, मुख्य समन्वयक, युवा करिअर क्लब (भ्रमणध्वनी क्र. ७२४८९७२२६२, ९६१९९१११९५१) यांचेशी संपर्क करावे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एका समन्वयकाची (Coordinator) नियुक्ती करुन आणि त्या समन्वयाचे नाव, पदनाम, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ता support@yuvacareer.com या ई-मेलवर पाठविण्यात यावे.

**सहपत्र :- संलग्नित**

**मा. प्र-कुलगुरु यांच्या मान्यतेने,**

(श्री. दिनेश नरोटे)
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीट, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव यांचे कार्यालय
आवक क्र. 6005 दि. 24/8/26

क्र.उशिस/'युवा करिअर क्लब' /मवि-१/ई. ३०५८४६४ दि.-स्वाक्षरीप्रमाणे

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 1291 दिनांक 25.8.2026
जावक क्र............. दिनांक..............

प्रति,

1. सर्व विभागीय सहसंचालक
   उच्च शिक्षण
2. सर्व कुलसचिव,
   सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे,

विषयः 'युवा करिअर क्लब' (बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर) यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती प्रसिद्ध करणे व विद्यार्थ्यांमध्ये व्यापक प्रसार/नोंदणी अभियान राबविण्याबाबत.

संदर्भः- १. मा.महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, मुंबई यांचे स्मरणपत्र क्र. जा.क्र. मराअजाआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र.१३९-२०२६/३९५० दि.२४.७.२०२६
२.शासन पत्र क्र. संकीर्ण -2026/सं.क्र.170/समन्वय, दिनांक 03/07/2026.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्रं.२ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. अवलोकन करावे.

उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, 'युवा करिअर क्लब' व 'बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर' यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील इयत्ता 8 वी ते 12 वी तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शनाशी संबंधित विविध प्रकारचे नावीन्यपूर्ण व डिजिटल शैक्षणिक उपक्रम चालविले जात्तात.

त्यानुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागांना या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी. या उपक्रमासंदर्भात अधिक माहितीसाठी कु. स्वाती पगारे, मुख्य समन्वयक, युवा करिअर क्लब (भ्रमणध्वनी क्र. 7248972262, 9619911951) यांचेशी संपर्क करावा. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एका समन्वयकाची (Coordinator) नियुक्ती करावी आणि त्या समन्वयाचे नाव, पदनाम, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ता support@yuvacareer.com या ई-मेलवर त्वरित पाठविण्याबाबत अधीनस्थ संस्थांना सूचित करावे.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 19-08-2026 13:01:35

( डॉ शैलेंद्र देवळाणकर )
प्र.शिक्षण संचालक,( उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठीः

1. मा. पोलिस निरीक्षक, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, डेअरी विभाग, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई - 400 018 (आपल्या संदर्भीय पत्र दि. 24/07/2026 च्या अनुषंगाने माहितीस्तव व अहवाल कार्यवाहीसाठी).
2. अध्यक्ष / संचालक (श्री. मोनल अरूण थुल), युवा करिअर क्लब, बोधिवृक्ष शिक्षण संस्था, शताब्दी चौक, मानेवाडा रिंग रोड, नागपूर (माहितीसाठी).

PGTD / प्र.वि.

MGC-प्रोप.

24/8/2026

Shri Umbirwade
परीक्षक कार्यवाही करावे.
25/8/26

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahto-mh@gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२६/ स.क्र. ७(००) /समन्वय

दिनांक:- ३ जुलै, २०२६.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक ( ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय:-** उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहिती पुस्तिका व संकेतस्थळांवर "युवा करिअर क्लब" विषयक माहिती प्रसिद्ध करणे तसेच नोंदणी अभियान तात्काळ प्रभावीपणे राबविण्याबाबत

सोबत डॉ. अनिल बोंडे, मा. राज्यसभा सदस्य यांनी मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांना लिहीलेले दिनांक ८/६/२०२६ चे पत्र पाठविण्यात येत आहे.

२. राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण संस्थांमध्ये " युवा करिअर क्लब" उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, प्रत्येक संस्थेच्या माहिती पुस्तिकेमध्ये व संकेतस्थळावर www.yuvacareer.com या संकेतस्थळाची माहिती समाविष्ट करण्याबाबत तसेच प्रत्येक महाविद्यालयात " युवा करिअर क्लब" उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी एका समन्वयाची नियुक्त करुन त्याचे नांव, पदनाम, मोबाईल क्रमांक व ई-मेल यांची माहिती support@yuvacareer या ईमेलवर पाठविण्याबाबत निर्देश देण्याची विंनती केली आहे.

३. तरी, सोबतच्या पत्रात दिलेल्या सूचनांनुसार, आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

आपली,
सं. पं. जाधव
(संचिता जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

उपसचिव, ( मशि/विशि/ तांशि/ साशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

**DR. ANIL S. BONDE**
MEMBER OF PARLIAMENT
(RAJYA SABHA)

जा.आय.पी.: V/2124/2026 001

प्रति, दि. 08/06/2026

मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील साहेब,
मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाशी संबंधित तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या माहिती पुस्तिका व संकेतस्थळांवर "युवा करिअर क्लब" विषयक माहिती प्रसिद्ध करणे तसेच नोंदणी अभियान तत्काळ प्रभावीपणे राबविणेबाबत.

संदर्भ :-
1) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.नं.१३/८६६१३६१/माशि-२, दिनांक ०७ ऑगस्ट २०२५.
2) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.०५/ई-८६६१३६१/तांशि-४, दिनांक २५ सप्टेंबर २०२५.
3) संचालक, तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र. २/NGC/युवा करिअर क्लब/DTEM/६२/२०२५-DESK २, दिनांक १० ऑक्टोबर २०२५.

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, राज्यातील सर्व उच्च व तंत्र शिक्षण संस्थांमध्ये "युवा करिअर क्लब" उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, याकरिता मी आपणास विनंती केलेली होती. त्याअनुषंगाने विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना सुद्धा दिल्या होत्या. परंतु अद्यापही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. प्रत्येक संस्थेच्या माहिती पुस्तिकेमध्ये व संकेतस्थळावर www.yuvacareer.com या संकेतस्थळाची माहिती समाविष्ट करण्यात यावी. याशिवाय, प्रत्येक महाविद्यालयात 'युवा करिअर क्लब' उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी एका समन्वयकाची नियुक्ती करण्यात यावी. नियुक्त समन्वयकाचे नाव, पदनाम, मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता यांची माहिती support@yuvacareer.com या ई-मेलवर पाठविण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत संबंधित सर्व महाविद्यालये व संस्थांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत. उपक्रमाच्या अंमलबजावणी संदर्भात कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास दूरध्वनी क्रमांक ९६१९९११९५१ वर संपर्क साधता येईल.

करिता संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी व संस्थांना आवश्यक आदेश निर्गमित करण्यात यावेत, ही विनंती.

धन्यवाद !

आपला

डॉ. अनिल बोंडे

"Jansangram", Near Hitech Hospital, Rajapeth, Amravati - 444 606 (M.S.)
**E-mail :** dranilbonde01@gmail.com, dranil.bonde@sansad.nic.in

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग

अधिनियम-२०२५

(सन-२०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७)

प्रशासकीय इमारत, पहिला मजला, डेअरी विभाग,

अब्दुलगफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई-४०० ०१८.

दूरध्वनी क्र.(कार्यालय): २४९४३८१९/०२

E-mail add:-scstcomm@yahoo.com


जा.क्र.मराअजाआ/मुं/सामाजिक व आर्थिक विभाग/प्र.क्र. १३९-२०२६/2892 दि: 3/०७/२०२६

प्रति,

मा. आयुक्त,
समाजकल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे,
३, चर्च रोड, आगरकर नगर, जि. पुणे-४११ ००१.

मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) ,
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे,
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे - ४११००१

मा. संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
४१२, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

मा. संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३, महापालिका मार्ग, पोस्ट बॉक्स नंबर १९६७
मेट्रो सिनेमा समोर, मुंबई - ४०० ००१.

मा. संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई,
सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ. दा. नौ. मार्ग, मुंबई - ४०० ००१.

मा. संचालक,
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई,
नगर भवन, शहिद भगतसिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००२३.

मा. जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हाधिकारी कार्यालय.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषद.

**विषय : अर्जदार श्री. मोनल अरूण थुल यांचे अर्जाच्या अनुषंगाने अहवाल सादर करणेबाबत.**

अर्जदार श्री. मोनल अरुण थूल, संचालक, युवा करिअर क्लब, बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर यांचा अर्ज महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास प्राप्त झाला आहे. दि. ०३.०७.२०२६ रोजी आयोगास प्राप्त अर्जाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. अर्जदाराच्या अर्जातील मुद्द्यांच्या अनुषंगाने अहवाल आयोगास सादर करावा, ही विनंती.

(रमेश वळवी)
पोलीस निरीक्षक,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग,
वरळी, मुंबई.

प्रत: श्री. मोनल अरुण थूल, संचालक, युवा करिअर क्लब, बोधिवृक्ष शिक्षण संस्था, नागपूर यांना माहितीस्तव.

Scanned with OKEN Scanner

# युवा करियर

प्रति,

DATE: 3-7-2026

मा. सदस्य सचिव,
महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग,
प्रशासकीय इमारत, वरळी डेअरी, वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोग, वरळी, मुंबई ४०० ०१८
आवक क्र. 3027 दिनांक : 3-7-2026
कार्यालय अधीक्षक

विषय : नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील इयत्ता ८ वी ते १२ वी तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कोर्स, NEET, JEE Main, JEE Advanced, NDA, UPSC, MPSC तसेच विविध स्पर्धा परीक्षा व कौशल्यविकास कोर्सेस एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर अत्यल्प शुल्क "प्रति विषय प्रति दिवस फक्त १ रुपया" उपलब्ध करून देण्याबाबत विनंती अर्ज.

अर्जदार : श्री. मोनाल अरूण थूल, रा- धरमपेठ, नागपूर, जि. नागपूर.

महोदय,

सविनय निवेदन असे की, "युवा करिअर क्लब" व "बोधिवृक्ष शिक्षण संस्था" या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, करिअर व रोजगाराभिमुख विकासासाठी सातत्याने कार्यरत आहोत. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, योग्य करिअर मार्गदर्शन मिळावे तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या उद्देशाने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच अनेक विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठीही युवा करियर क्लब मार्फत विशेष प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

युवा करिअर क्लब द्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, विविध शासकीय योजना, करिअर संधी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अद्ययावत माहिती सातत्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासोबतच "युवा करिअर क्लब" व "YuvaCareer.com" या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांपर्यंत उपयुक्त माहिती पोहोचविण्याचे कार्य अनेक वर्षांपासून सुरू आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात NEET, JEE Main, JEE Advanced, NDA, UPSC, MPSC तसेच विविध स्पर्धा परीक्षा व कौशल्यविकास कोर्सेस यांच्या कोचिंग फी अत्यंत महाग झालेल्या आहेत. अनुसूचित जाती व जमातीच्या ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध होण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. ही बाब लक्षात घेऊन आम्ही एक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे.

या उपक्रमांतर्गत इयत्ता 8 वी ते 12 वी तसेच पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शनाशी संबंधित कोर्सेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अत्यल्प शुल्क "प्रति विषय प्रति दिवस फक्त 1 रुपया" आकारण्यात येणार असून देशातील नामांकित व अनुभवी तज्ज्ञ शिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाइन स्वरूपात मार्गदर्शन देण्यात येईल.

नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत अथवा कार्य केलेल्या तज्ञ व अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम पूर्णतः डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने दर्जेदार स्टडी मटेरियल, लाइव्ह व रेकॉर्डेड क्लासेस, नियमित ऑनलाइन AI प्रॉक्टरिंग पद्धतीने टेस्ट सिरीज, प्रश्नोत्तरे, डाऊट सॉल्व्हिंग सेशन्स तसेच विषयानुसार सखोल मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



Scanned with OKEN Scanner

तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे नियमित मूल्यमापन, उपस्थिती नोंद, गुणवत्ता तपासणी आणि वैयक्तिक शैक्षणिक मार्गदर्शन देखील करण्यात येणार आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण सहज उपलब्ध व्हावे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

यासोबतच विविध क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी, करिअर मार्गदर्शक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींना नियमित "Guest Lecture" व संवाद सत्रासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअरविषयक प्रेरणा, अद्ययावत माहिती, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक दिशा मिळणार आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील :

**१) ३६५ दिवस नियमित ऑनलाइन अध्यापन**

- UPSC, MPSC, NEET, JEE, NDA तसेच इतर स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमानुसार दररोज ऑनलाइन वर्ग.
- पूर्वपरीक्षा, मुख्य परीक्षा, मुलाखत तसेच प्रवेश परीक्षांसाठी आवश्यक मार्गदर्शन.
- चालू घडामोडी, सामान्य अध्ययन, निबंध लेखन, CSAT, व्यक्तिमत्व विकास तसेच NEET साठी Physics, Chemistry, Biology आणि JEE साठी Physics, Chemistry, Mathematics या विषयांचे सखोल अध्यापन.
- NDA परीक्षेसाठी Mathematics, General Ability Test (GAT), इंग्रजी व SSB मुलाखत मार्गदर्शन.

**२) देशातील अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन**

- विविध नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असलेले अनुभवी शिक्षक विद्यार्थ्यांना अध्यापन करतील.
- UPSC, MPSC, NEET, JEE, NDA व इतर स्पर्धा परीक्षांसाठी विषयानुसार सखोल, विश्लेषणात्मक व परीक्षाभिमुख मार्गदर्शन दिले जाईल.

**३) वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व तज्ज्ञ व्यक्तींसोबत संवाद**

- IAS, IPS, IRS, IFS तसेच इतर वरिष्ठ शासकीय अधिकारी यांची विशेष मार्गदर्शन सत्रे.
- वैद्यकीय, अभियांत्रिकी व संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, यशस्वी विद्यार्थी व अधिकारी यांच्यासोबत संवाद.
- विद्यार्थ्यांच्या शंकानिरसनासाठी प्रश्नोत्तर सत्रे.

**४) डिजिटल स्टडी मटेरियलची उपलब्धता**

- विषयनिहाय नोट्स, PDF स्वरूपातील अध्ययन साहित्य.
- चालू घडामोडींचे संकलन व विश्लेषण.
- सराव प्रश्नसंच, PYQs (Previous Year Questions), Mock Tests व संदर्भ साहित्य.

**५) नियमित चाचण्या व मूल्यमापन :**

- साप्ताहिक, मासिक व विषयनिहाय ऑनलाइन परीक्षा.
- UPSC, MPSC, NEET, JEE, NDA व इतर स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर प्रश्नपत्रिका व मूल्यांकन.
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्याने परीक्षण.

DATE:

६) AI Proctoring आधारित परीक्षा प्रणाली

- ऑनलाइन परीक्षांमध्ये पारदर्शकता व शिस्त राखण्यासाठी आधुनिक AI Proctoring तंत्रज्ञानाचा वापर.
- परीक्षेतील कामगिरीचे अचूक विश्लेषण.

७) विद्यार्थी उपस्थिती व सहभाग नोंद प्रणाली

- विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीची नोंद.
- वर्गातील सहभाग व अभ्यासातील सातत्याचे निरीक्षण.

८) प्रगतीपत्रक व अहवाल प्रणाली

- प्रत्येक विद्यार्थ्याचे वैयक्तिक Progress Card तयार करण्यात येईल.
- विषयनिहाय कामगिरी, गुणांकन व सुधारणा सूचना देण्यात येतील.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा नियमित अहवाल उपलब्ध करून देण्यात येईल.

९) करिअर मार्गदर्शन व मेंटरशिप

- UPSC, MPSC, NEET, JEE, NDA तसेच इतर स्पर्धा परीक्षांचे नियोजन, वेळ व्यवस्थापन व अभ्यास तंत्र याबाबत मार्गदर्शन.
- विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक शैक्षणिक मार्गदर्शन व मेंटरशिपची सुविधा.

१०) रेकॉर्डेड लेक्चर्स व पुनरावलोकन सुविधा

- अनुपस्थित विद्यार्थ्यांसाठी रेकॉर्डेड सत्रांची उपलब्धता.
- कोणत्याही वेळी अभ्यासाचे पुनरावलोकन करण्याची सुविधा.

११) सर्व स्पर्धा परीक्षांसाठी एकात्मिक तयारी

- UPSC, MPSC, NEET, JEE, NDA तसेच इतर केंद्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा यांसाठी एकाच प्लॅटफॉर्मवर गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उद्दिष्टांनुसार स्वतंत्र अभ्यास योजना, मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रगतीचे निरीक्षण.

वरील योजना आपल्या अधिपत्याखालील शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, आश्रमशाळा तसेच इयत्ता ८ वी ते १२ वी, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा, करिअर मार्गदर्शन व कौशल्यविकासाशी संबंधित कोर्सेसचा लाभ सहज व कमी खर्चात उपलब्ध व्हावा हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

Scanned with OKEN Scanner

DATE:

तरी आपल्या महाराष्ट्र राज्यतील सर्व शासकीय व अनुदानीत, शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे, आश्रमशाळा,मदरसे तसेच संबंधित संस्थांमार्फत ही योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी व नोंदणी प्रक्रिया www.yuvacareer.com/www.yuvacareer.club या संकेतस्थळा द्वारे केली जाईल सदर लिंक सर्व शासकीय संकेतस्थळ व महाविद्यालय आणि शाळा प्रशासनाच्या संकेतस्थळ माहिती पुस्तिकेत व नोटीस बोर्ड द्वारे विद्यार्थ्यांना पोहचवावी सर्व संस्थानी एक अधिकृत समन्वयक नेमून नाव संपर्क क्रमांक पदनाम अधिकृत ईमेल बाबतची सदर माहिती support@yuvacareer.com वर ईमेल करावी, ही नम्र विनंती.

सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अत्यल्प खर्चात दर्जेदार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन उपलब्ध होऊन त्यांचे शैक्षणिक व करिअर भविष्य अधिक सक्षम होण्यास मोठी मदत होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

तरी सदर नावीन्यपूर्ण योजना राबविण्यास आवश्यक सहकार्य करावे व संबंधित अधिकारी ह्यांना विद्यार्थीच्या हिताचे असल्याने आदेश निर्गमित करावे, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

अध्यक्ष / संचालक
युवा करिअर क्लब
बोधिवृक्ष शिक्षण संस्था

Phone.
9619911951
Email.
support@yuvacareer.com
Address.
Shatabdi Sq. Manewada Ring Rode.

Scanned with OKEN Scanner